RID 3131 RY 2024-25
Club 22422

THE MAGIC OF ROTARY

ROTARY CLUB of Pune-Shivajinagar

# THE MAGIC OF PUSH ROTARY

rotarypuneshivajinagar.org

*President* Rtn Dr. Bharati Dole 98509 61770 *Secretary* Rtn Sachin Joglekar 98331 12400 *Editor* Rtn Ann Shobhana Date 93722 59991

***October Issue***

## मन की बात



नमस्कार मित्र मैत्रिणिंनो

सप्टेंबर तसा शांत शांतच गेला. गणरायाच्या स्वागतामध्ये आपण गर्क होतो. तरीसुद्धा दोन अतिशय महत्वाचे प्रकल्प आपण पुर्ण केले. २ सप्टेंबरला आपण शिक्षक दिन साजरा केला. किसन गोरे व गौरी जाधव ह्या गुणवान शिक्षकाचा आपण सन्मान केला. किसन गोरे हे ताम्हिणी घाटामध्ये तळागाळातल्या मुलामुलींसाठी शाळा चालवतात. त्यांना स्वछतेचे धडेही देतात. उत्तम दर्जाचा ध्यास असल्याने त्यांनी शाळेसाठी ISO नामांकनही प्राप्त केले आहे. गौरी जाधव Society For Doorstep School तर्फे बांधकाम मजुरांच्या मुलांना शिक्षण देतात. आतापर्यंत त्यांनी १५०० मुलांना शिक्षण प्रवाहात आणले आहे. असे उदात्त काम करण्याऱ्या शिक्षकांचा सन्मान आपण करू शकलो हे आपले भाग्यच आहे.

९ तारखेला अॅन प्रतिमा आपल्याला पक्षांच्या जगात घेऊन गेली. १७ आणि १८ तारखेला तर आपली सहल ! नुसती मजा, मस्ती, खाणे पिणे, गाणी, खेळ ! खूप धमाल आली. मुळशीतले सहलीचे ठिकाण फारच रम्य होते. २३ तारखेला एक अपूर्व योग आला. Annet अपूर्व इनामदारने Iron Man ची दृक शाव्य माध्यमाद्वारे आपल्याला ओळख करून दिली. या वर्षीची एकांकिका स्पर्धा आपल्यासाठी खास आहे. रौप्य महोत्सवी वर्ष आहे. सगळ्यांचा सहभाग असावा म्हणून ३० तारखेला घेतलेली मीटिंग उत्तम झाली.

Anemia Detection and Prevention ह्या क्षेत्रामध्ये आपल्या क्लबने खूप पथदर्शी काम केले आहे. या वर्षी डिस्ट्रिक्टचाही त्यावर भर आहे. आपण १००० शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करणार आहोत. यातील जवळजवळ ५०० विद्यार्थ्यांची तपासणी पूर्ण झाली! राव पतिपत्नींची अपार मेहनत व क्लबमधील सदस्य आणि anns यांचे सहकार्य व सहभाग यामुळे आपण एवढा मोठ्ठा टप्पा पार करू शकलो. आरोग्याबरोबर आपण विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचीही काळजी घेतो. पुण्याबाहेरील शाळांमधील दहावीच्या २९४ विध्यार्थ्यांना आपण study app दिले.






Come September म्हणेपर्यंत तो संपलाही! ऑक्टोबर महिना म्हणजे अँनचा भोंडला, एकांकिका स्पर्धा, कौतुक समारंभ आणि आपण उत्सुकतेने वाट पाहत असलेली दिवाळी पार्टी!. या वर्षीसुद्धा दिवाळीला मस्त मनोरंजनाचा कार्यक्रम व सुग्रास जेवण असे चढत्या भाजणीतले कार्यक्रम !

तर मंडळी ऑक्टोबर महिना क्लबच्या नावे करून ठेवा.-----

आपली विनीत

**डॉ. भारती डोळे**

अध्यक्ष

## संपादकीय



आता आपले रोटेरियन मित्र-मैत्रिणी वेगवेगळी प्रोजेक्ट आणि घरच्या गणपतीचे आगमन आणि विसर्जन यातून नुकतेच मोकळे झाले आहेत.

त्यातून झालेल्या दमणुकीसाठी अप्रतिम आयोजन केलेली रोटरी पिकनिक एन्जॉय करून रिफ्रेश होऊन आलेले आहेत. आमची पुश टीम सुद्धा अशा मित्र-मैत्रिणींना दर महिन्याला काही नवीन देण्याचा प्रयत्न करत असते.

आता ऑक्टोबरचा महिना एकांकिका स्पर्धा आणि दिवाळी पार्टी यामुळे खूपच बिझी जाणार आहे. या महिन्याच्या पुश मधले आपली नेहमीची सदरे तर आहेच पण मला आपल्याला आठवण करून द्यायचे आहे की यानंतरचा अंक हा आपला दिवाळी अंक असणार आहे. दरवर्षी आपला दिवाळी अंक खूप वेगवेगळ्या विषयांनी नटलेला असतो म्हणूनच या वर्षी आमच्या टीमने हा अंक खालील विषयांवर काढण्याचे ठरवले आहे. कथा, अनुभव, पुस्तक, गाणं, सिनेमा यावरील स्वतःचे भाष्य, कविता, चारोळ्या अशा विविध विषयांनी समृद्ध अंक काढण्याची आमची इच्छा आहे. त्यासाठी मी आपल्याला आवाहन करते की आपल्या मदतीशिवाय आणि प्रतिसादा शिवाय आमची टीम हा अंक सुंदर करूच शकत नाही तरी मी परत आमच्या टीमच्या वतीने आपल्याला विनंती करते की आपण भरभरून प्रतिसाद देऊन पुश चा अंक सर्वांग सुंदर करण्याचा प्रयत्न करूया.

संपादक

**शोभना दाते**

*For Private circulation only*

## Monthly Programs

**दिनांक ९ सप्टेंबर – चला पक्षांच्या जगात भटकायला**

प्रतिमा दुरुककर यांनी सादर केलेला पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम छान




झाला. या कार्यक्रमातून त्यांचा पक्षांविषयीचा अभ्यास, प्रेम आणि जिव्हाळा दिसून आला. आपल्या रोजच्या जगण्यात पक्षी कसा आनंद निर्माण करतात याचे विवेचन त्यांनी केले. कार्यक्रमात दाखवलेली पक्षांची छायाचित्र अप्रतिम होती, यानिमित्ताने त्यांच्या फोटोग्राफी कलेचा परिचय झाला. पक्षांच्या सहवासात एक रम्य संध्याकाळ गेली.

**रो. बाळकृष्ण दामले**

**१७ आणि १८ सप्टेंबर – क्लब पिकनिक**

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही रोटरीची पिकनिक १७ सप्टेंबरला मुळशी येथे ठरली. मुळशीच्या रेसिडेन्सी लेक रिसॉर्ट येथे ठरली. सगळेजण मस्त उत्साहाने निघालो आणि साधारणपणे १२.३० बाजेपर्यंत रिसॉर्टला पोहोचलो. अगदी रस्त्याला लागूनच रिसॉर्ट आहे. त्यामुळे फार काही शोधाशोध करावी लागली नाही. आपापल्या गाडीतून उतरलो आणि नजरे समोर पाहिले तर अऽहाऽहा असेच झाले. सुंदर लोकेशन होते. अशोक आणि टीमने केलेली व्यवस्था एकदम चोख होती. दूपारी



मस्त जेवण झाले. झोप झाली. त्यानंतर भरपूर फोटो काढून झाले. क्रिकेट खेळून झाले. घसरगुंडीवर बसले (फक्त मीच बरं का) संध्याकाळी सगळे छान छान तयार होऊन आले आणि सुरुवात झाली फन गेम्सची. माधुरीने खूपच क्रिएटिव्ह गेम्स ठेवले होते. एवढी वर्ष विविध साबण वापरले पण याची अशी गोष्ट होऊ शकते हा विचार सुध्दा कधी केला नव्हता. दुसरा गेम सगळ्या जाहिरातींची टॅग लाईन. खूप धमाल आली. त्यानंतर तंबोला डान्स आणि डिनर झाले. भरपूर गप्पा झाल्या. नंतर सुंदर दिसणारा चंद्र बघून दिवस छान गेल्याने समाधान मिळाले.

दुसऱ्या दिवशी मुळशी लेक बघत मस्त वॉक झाला. चहा, ब्रेकफास्ट करुन निघालो. अशोक आणि टीमचे पुन्हा एकदा आभार. निसर्गाच्या सान्निध्यात रिलॅक्स होऊन रिचार्ज होऊन पुण्याकडे परत आलो.

**ॲन रश्मी जोगळेकर**

**आयर्न मॅन**

**सोमवार दि. २३ सप्टेंबर** रोजी आपल्या क्लबमध्ये सर्वात तरुण असलेला आणि आपल्या रोटरी फॅमिलीमधला असा हा अपूर्व इनामदार ह्याचा कार्यक्रम सादर झाला.विषय होता आयर्न मॅन जर्नी

अपूर्वला खेळाची आवड शाळेपासूनच होती. बॉस्केटबॉल हा त्याचा आवडता खेळ होता. त्यातही अपूर्वने स्टेट लेव्हल पर्यंत बॉस्केटबॉल उत्तमपणे खेळला.

२०१९ पासून रनिंग मॅरेथॉन करायला सुरुवात केली. हाफ मॅरेथॉन त्यानंतर २ त्याने पूर्ण मॅरेथॉन यशस्वीरित्या केल्या. हे सर्व करतांना अपूर्वने आपला फिटनेस अतिशय उत्तम सांभाळला.

ह्यानंतर अपूर्वने आयर्न मॅन होण्याचे स्वप्न बघितले आणि ते पूर्ण केले. एकाच दिवसांत प्रथम पोहणे नंतर रनिंग आणि शेवटी सायकलिंग अशा क्रमाने आयर्न मॅनची स्पर्धा पूर्ण केली.

स्पर्धेमध्ये भाग घेण्याचे ठरविले तेव्हापासून पूर्ण करेपर्यंतचा प्रवास खूप खडतर होता. यासाठी २/३ महिने पूर्णपणे ट्रेनिंग मध्ये इनडोअर जवळपास ५ तास सायकल चालविली. तसेच ४ तास पोहणे केले. रोज २ तास रनिंग केले. अशा पध्दतीने फिटनेस ठेवण्याचे आणि मनाचे स्वास्थ्य देखील जपले.

ऑस्ट्रीया येथे होणाऱ्या स्पर्धेमध्ये २८००लोकांनी आयर्न मॅन साठी भाग घेतला होता. सलग १७ तासांमध्ये ३.८ कि.मी. पोहणे, ४२.२ कि.मी. पळणे आणि १८० कि.मी. सायकलिंग करण्याचे चॅलेंज होते. त्यांचे नियम खूप कडक होते. सायकल चालविताना खूप चढ उतार होते. एकंदरीत हा प्रवास त्याने जिद्दीने आणि आत्मविश्वासाने पूर्ण केला. त्याबरोबर स्पर्धेच्या दिवशी युरोपमधील हवामानाप्रमाणे



सकाळी थंड दुपारी भरपूर पाऊन संध्याकाळी थोडेसे ऊन होते. अशा या हवामानामध्ये..... एखादी व्यक्ती महान आणि संपूर्ण ताकदवान व पूर्ण क्षमता असलेली आणि आपले कौशल्य पणाला लावून, कठिण प्रसंगीसुध्दा संपूर्ण वेळ आपला खेळ सुरुच ठेवते, यशस्वी होते. ह्यालाच आयर्न मॅन म्हणतात.

ह्या व्याख्येप्रमाणे अपूर्व हा सर्व गुणसंपन्न तर आहेच आणि त्याने आयर्न मॅनचे बक्षिस देखील मिळविले. खूप कौतुक.

पुढील स्वप्नांसाठी आणि वाटचालीसाठी अपूर्वला खूप खूप शुभेच्छा!

**रो. अंजली रावेतकर**

## Club Assembly

The club assemble was held on 30th Sept.2024 at 7.30 PM in Arkey Hall.

President Bharati Dole welcomed all the attendees. President briefed; appreciated completed projects.in the meeting . Birthday celebrations were done.. Paul Harris Fellow – Level 1 pins were presented to Rtn Aniruddha Inamdar & President Rtn Bharati Dole. Pins were presented by Rtn Nitin Naik; Rtn Ujwal Marathe respectively.

Swati Kshirsagar Karandak Ekankika Spardha convener Rtn Achut Gokhale; co convener Rtn Shirish Kshirsagar. briefed members on preparation done so far ; work to be done. Various responsibilities for Ekankika week were outlined & assigned. President announced next week's program and meeting was adjourned.

**Club Secretary – Sachin Joglekar**







On 29 th September Birthday and Anniversary celebrations were organized at Multi Spice restaurant Ann Neha Pathak and spouse Ashish Nerlekar organized the celebration. Everyone enjoyed the Delicious menu and scenic venue

## Avenue Wise Reports

**Medical avenue - Director PP Dr. Shobha Rao**


**Cherry Blossom Project**

A Health camp was organised during 2nd to 5th September 2024, for students from 5th to 10th standarad of Madhyamik School. The objective was identification and prevention of anaemia among students. Total of 468 were examined for weight, height, Hb and eye check-up. Eye check up was outsourced to Atharva Netralaya. Students requiring new spectacles or needing further examination were advised to visit Atharva Netralaya. Artharva Netralaya will provide New Spectacles or further investigation if necessary, at subsidised rates.


The data analysis and results are summarized as follows-

1) Girls between 11 to 14 yrs had higher weights compared to boys
2) As regards height, boys older than 13 years were taller than girls. In fact from 5th std to 10th std girls increase in height was only 16.2 cms while Boy's height increase was 27 cm. This means girls will be short as adult with high BMI which is not healthy sign.

Fig: Mean weights and heights of students by age



3) Mean Hb for girls was lower than that for boys at every age




4) However, boys were far below their Normal value of Hb i.e.14 compared to that in girls for whom the Normal value is 12
5) Therefore, proportion of anaemic boys was more (around 80%) than girls (30 to 50%).

Every student was given 1 pamphlet, and the school was given 2 charts for display explaining ideal diet. Dr. Shobha Rao also briefed the parents about importance of the project and ideal diet in Parent teacher meeting.This would certainly help in prevention of anaemia.

Pres Dr Bharati, PP Dr Shobha, , PP DR Rao, PP Anjali, PP Vrinda, PP Sharad , Rtn Ramesh Bhatia , PP Dr Smita, Rtn Madhuri, Rtn Pradeep Godbole and Ann Shilpa, Ann Nirupama participated in the project.

This project is funded by Pesi Pocha Trust . PP Ujwal Marathe had taken initiative in securing funds from the Trust.







**Non medical avenue : Director PP Vrinda Walimbe**
**Foodgrains were supplied to Sarthak seva sangh**



- We have received Charter from RI for RCC (Rotary Community Corps) formed in Madhyamik Vidyalay. Charter ceremony will be organised soon.
- Ann Girija has donated cotton silk cloth to Sarthak Seva Sangh . The girls are going to stich new clothes for Diwali.

**Literacy - Chairman PP Anjali Ravetkar**

21st September RCPS distributed to Students from another 5 Schools. All School are rural area.
Total 294 study app were distributed to 10th St. Students.

**School Name**

1) New English School Nangaon 58
2) Shri Rakdovanath Vidyal Bhandgaon 63
3 ) Kailash Vidyamandir Rahu 99
4 )Tribak Divekar Vidyalay Kadehan 44
5) Jai Malhar Vidhylay Delwadi Daund 30

All Students are very happy about app. Received thank you letters from Schools where we distributed 10th St .App. PP Nitin Abhyankar had big help in the completed of this project.

New English School Nangaon.







**Vocational - Director Rtn Anirudha Inamdar**

We felicitated two teachers on the occasion of the Teachers Day. Mr. Kiaan Gore who rose from very humble origin, who had to walk 13 or 14 kilometers everyday for schooling, established a school "Vinzai Devi High School" in the Tamhini area. Children staying in and around that area are studying in that School. More importantly girls and Children from the lower strata of the society also were brought to the school and they continue studying there.

He improved the surrounding area, inculcated the concept of hygiene among the students as a result of which the school was awared Chief Ministers Trophy, school has received ISO accreditation.



With the help of generous donation from the society, school has got buses, educational aid. What is noteworthy is all children continue studying without drop out. Bharati Vikas Parishad has adopted the hostel started by you.

Second teacher was Mrs.Gauri Jadhav. Study conducted by The Society For Doorstep School revealed that children of construction workers are deprived of School.

She on behalf of DSSF has taken up the responsibility of going to construction sites and teaching children there. She teaches Marathi language , basic Mathematics and use of tools, tackles and instruments. Till date the number of children who have been trained by Gauri is a whopping 1500.

These children could have otherwise gone astray, but now they are responsible helping members of their household.

She is side by side training other teachers to ensure that the thread continues.

**Public Image – Director PP Sharad Dole and Synergy – Chairman PP Shirish Kshirsagar**

Our club was one of the host clubs of "Indradhanu", a cultural event organized by RID 3131 on 16 th Sept 2024 under "Pune festival" at Balgandharva Rangmandir. This event provided a platform to Rotarians, Anns and Annets to showcase their singing and dancing talent. Rtn Rahul Pendharkar (song) & PP Shirish Kshirsagar (Violin) from our club performed at the event. Their performances were very well received by the audience. President Dr. Bharati Dole accepted our club's felicitations by RID 3131 and Pune Festival organizing committee.



Our club was provided space to have a stall at the event. This provided a good opportunity to us to reach out to audiences attending the event to showcase our projects and work done by us and improve public image of RCPS and Rotary.

DG Shital Shah; PDG Mohan Palesha visited our stall and appreciated the information about projects and our club activities being shared with general public. PP Dr. Suryaprakasa Rao and PP Dr. Shobha Rao conceptualized the content to be shared with public. Our brochures regarding diet, nutrition and club projects were well received by those who visited our stall. All in all it was good public image exercise relevant Synergy Project.







**International Service and peace- Director PP Dr. Pradeep Wagh**

Peace oath was a administered on 27th Sept . to students in Madhyamik vidyalya . more than one hundred students participated in the Peace oath



## Moment of Pride

**Our club was recognised for Foundation Giving for the month of August 2024**

**We are number one in zone 5 of RID 3131 in Foundation Giving**

### Rotary International and District 3131

**October month- Economic and Community Development**

- Rotary International launched its celebrity ambassador program on 19 September, welcoming Kat Graham, Sibongile Mlambo, Gaby Moreno, and Archie Panjabi.While launching the program Rotary International President Stephanie Urchick said. "As Rotary's work has touched each of the ambassadors, we're honored for them to amplify our organization's impact and vision."
- The ongoing crisis in Gaza has contributed to reduced routine immunization rates and an increased risk of vaccine-preventable diseases, including polio. The crisis also poses a significant challenge to fully implementing disease surveillance and vaccination campaigns. A humanitarian pause has allowed a two-round polio vaccination campaign that began in Gaza on 1 September . Rotary is committing US$500,000 to bolster the initiative, channeling these funds through a dedicated Polio Outbreak Response Fund. This contribution represents Rotary's sustained support to the WHO in combating polio globally.
- RID 3131 is organizing Indradhnu Part II on 21st Oct 2024 at Yeshawantrao Chavan Natyagruha
- Rtn kailash Monga has been appointed as Rotary International Convention Promotion Chair for RID3131

## Rotary Information by PP Yashwant Gokhale

**4-way Test**

**'A test for all times and all people'**

Have you heard of the 4-way Test? It's one of the most widely printed and quoted statements of business ethics in the world. It was created in 1932 by Rotarian Herbert J. Taylor, who later became R.I. President in the year 1954-55. He developed this 24-word test for employees to follow in their business and professional lives when he was asked to take charge of a company facing bankruptcy. He wanted to take all the workmen, suppliers and vendors into confidence and together they could bring back the golden days of that company. In that process, he conceptualized the idea of the 4-way Test.

The 4-way Test consists of four questions:

1. Is it the truth?
2. Is it fair to all concerned?
3. Will it build goodwill and better friendships?
4. Will it be beneficial to all concerned?

In 1954 , he gifted the copyrights for The 4-way Test to Rotary International. It has been translated into over 100 languages and published in various forms. Let's discuss its relevance in today's world.

1. Truth and integrity:

The first question emphasizes honesty and authenticity, promoting trust and meaningful connections in our personal and professional lives.

2. Fairness and justice:

The second question challenges us to evaluate whether our actions treat all individuals fairly, fostering inclusivity and addressing systemic inequalities.

3. Goodwill and better friendship:

The third question encourages us to reflect on whether our actions contribute positively to relationships, promoting harmony and respect.

4. Benefit to all:

The final question reminds us to consider the broader impact of our decisions and prioritize the welfare of all, aiming to create a more sustainable, just, and compassionate world.

## Golden Memories by Anil Damle

**रोटरी – काही आठवणी**

आपली रोटरी क्लब ''रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगरची'' स्थापना १९८५ सालातील. स्थापनेपूर्वी होतकरु सदस्य ५/६ महिने भेटत होते. रोटरी क्लब ऑफ पुना वेस्ट क्लबने आपला क्लब स्थापन करण्यास पुढाकार घेतला होता. तेव्हा पुना वेस्टमध्ये माझे वडील दादा दामले हे एक सदस्य होते. पुना वेस्ट जेव्हा स्थापन झाला तेव्हा दादा दामले चार्टर प्रेसिडेंट होते. त्यांचे सहकारी बाळ धारप, कल्याण वर्दे, अविनाश ओगले, मुकुंद अभ्यंकर आणि अनिरूध्द कुलकर्णी ह्या सर्वांचा आपला क्लब स्थापण्यात मोठा हातभार होता. आपला क्लब स्थापनेपूर्वी ह्या सर्व सदस्यांनी त्यांच्या ओळखीचे होतकरू सदस्य एकत्र केले आणि आम्ही काही जण भेटायला लागलो. सुरुवातीला बी.एम.सी.सी. कॉलेजमध्ये आम्ही भेटत होतो. पुढे क्लबला चार्टर मिळाला आणि आपला क्लब स्थापन झाला. तेव्हापासूनचे जे काही आम्ही सदस्य आहोत त्यांना चार्टर मेंबर संबोधले जाते. मुकुंदराव, यशवंत, मी, शिरीष, गुरुनाथ, शाम, विनुभाऊ, अविनाश आणि आ.टी. असे ९ सदस्य चार्टर मेंबर आहोत.

चार्टर प्रेसिडेंट मुकुंदराव व सेक्रेटरी अनिरूध्द कुलकर्णींनी क्लबची धुरा दीड वर्षे सांभाळली आणि क्लबची चोख बांधणी केली. हळूहळू करत दरवर्षी आपला क्लप चढत्या भाजाणीप्रमाणे डिस्ट्रिक्टमधे नावारुपास येऊ लागला आणि सध्या आपला क्लब इतिहास रचणारा समजला जाऊ लागला.

१९८८/८९ मधे तात्या रानडे आपल्या क्लबचे अध्यक्ष होते. त्या वर्षी मी क्लब सेक्रेटरी होतो. तेव्हा क्लबचे सभासद अवघे ४०-४५ च्या घरात होते. मोबाईल, ई-मेल, व्हॉटस्अप काही नव्हते. दर आठवड्याच्या सभेची माहिती व सभासदांना मला आमंत्रण पाठवावे लागे. पोस्टकार्डवर हाताने मजकूर लिहून पत्रे चिटकवून मी ही कार्ड दर महीन्याला प्रत्येक सभासदाला पाठवायचो.

त्या दरम्यान उरळी कांचन - यवतच्या नजीक माझी शेती खामगांवला होती. तेथे मी लहान मुलांसाठी निसर्ग अभ्यास शिबिराचं आयोजन

केलं होतं. तात्या रानडे यांच्या हस्ते मुला/मुलींना बक्षिस दिली होती.

पुढे १९९४/९५ दरम्यान मी क्लबच्या अध्यक्षपदाची सुत्रं घेतली. त्या वर्षी बरेच उपक्रम नव्याने सुरु झाले. गणपती विसर्जनाच्या दिवशी महाबळेश्वरची ट्रीप. बसने क्लबमधील ४५ जणांचा सहभाग होता.

क्लबच्या बोर्डाची मिटींग प्रथमच पुण्याच्या बाहेर सिंहगड जवळील सॅट सन रेझॉर्ट मधे आयोजित केली होती. एक रात्रीचा मुक्काम होता.

त्यावेळी बोर्ड मिटींग बहुतेक वेळा बोर्डच्या प्रत्येक मेंबरच्या घरी आयोजित केली जायची. बोर्ड मेंबर १०/११ एवढेच असत. त्यामुळे बोर्ड मिटींगचा पसारा आजच्या एवढा नसे.

दर महिन्याच्या एका मिटींगची फेलोशिप सभासद घरी बनवून आणत.


सुरुवातीची अनेक वर्षे क्लबचे अध्यक्षपद मिळावे म्हणून अनेक सभासद उत्सुक असत. काही वेळा हा का तो अध्यक्ष होईल त्यासाठी सुरस असे.


जुने सभासद सिनीयर मेंबर्स अशी वर्णन सभासदांची होतात. पण त्यात एवढंच तथ्य असतं की सिनीयर मेंबर हाच फक्त सर्वज्ञ असं नसतं. पण त्यानं क्लबची वाटचाल, इतिहास, जडण घडण, बरे वाईट प्रसंग, क्लबच्या अडचणी पाहीलेल्या असतात. त्याच्याकडे अनुभवांची शिदोरी असते. सर्व सभासद रोटरीच्या चक्रांत बांधलेले राहाणं. त्या चक्रातच राहून रोटरीची कामं, एकमेकांतले घरोब्याचे संबंध जपायचे, वाढवायचे. मग खरी मजा कळते. अनुभवायला मिळते. ''इसीका नाम रोटरी है।'

**पीपी रो. अनिल दामले.**

## Congratulations !!

- **PP Vrinda Walimbe** successfully completed Master in Transactional Analysis. She was also felicitated as Navdurga by RID 3131
- President Dr Bharati and PP Sharad Dole were invited as guests for felicitations organized by Madyamik School. Under 14 girls team won second place out of 166 teams.
- RTN Manjiri Dhanmankar's book of translations of Taslima Nasrin's stories was published recently
- Ann Sima Mahajan attended RC Sunnyvale meeting.on the invitation of Rutawari Sharma ( annet Rutawari is daughter of PP Vinubhau Dani). She also exchanged flag with the club
- PP Shirish Kshirsagr's paintings were displayed in the exhibition at Balgandhrv Rangmandir . The paitings wee widely appreciated.
- RTN Rahul visited RC Philadelphia and exchanged flags. He also spoke for few minutes
- Rtn Rajendra Waikar was felicitated by Pune Saraf Association for dedicated service of twenty four years .













## Wedding Anniversary



| | |
|---|---|
| Abhyankar Nitin & Alka | 15th October |
| Gokhale Vijay & Madhuri | 08 November |
| Dhamankar Manjiri& Dr. Dilip | 14 November |
| Kapre Parag & Pallavi | 23 November |

## Birthdays




***May God bless you with health, wealth & peace***

| | |
|---|---|
| Kshirsagar Shirish | 14 October |
| Bhatia Sunita | 15 October |
| Damle Balkrishna | 17 October |
| Wagh Meenal | 18 October |
| Nerlekar Ashish | 18 October |
| Tapaswi Sandeep | 23 October |
| Phulambrikar Manoj | 04 November |
| Walimbe Vrinda | 04 November |
| Damle Anil | 11 November |
| Dhamankar Manjiri | 11 November |
| Dole Sharad | 12 November |
| Gadgil Anjali | 12 November |
| Durugkar Pratima | 18 November |
| Abhyankar Alka | 20 November |
| Durugkar Pradeep | 24 November |
| Godbole Ajay | 24 November |



We deeply mourn the sad demise of our ex member Datta Inamdar

OM Shanti OM

Dr Bharati Dole
President

Sachin Joglekar
Secretary

## Support Group - November

**Rtn Nitin Naik (Leader)**
Ann Shilpa Naik
Rtn Chandrashekhar Mahajan
Ann Seema Mahajan
Rtn Vikas Kakade
Rtn Kalpana Kakade
Rtn Sanjeev Chaudhary
Rtn Mukundrao Abhyankar
Ann Anjali Abhyankar

रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर
आयोजित
स्वाती क्षीरसागर करंडक एकांकिका स्पर्धा २०२४-२०२५
रौप्य महोत्सवी वर्ष

रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर सादर करत आहे

## हे सुरांनो बंद व्हा !

लेखन : ओंकार गोखले
दिग्दर्शन : योगेश पेलवडे, अमेय रुद्र
कलाकार :
रो. शेखर यार्दी, रो मंजिरी धामणकर, रो दीपा साठे , रो स्नेहा भावे,
रो मृणाल नेर्लेकर , ॲन प्रतिमा दुरुगकर, रो रेश्मा कुलकर्णी , रो प्रमोद पाठक,



स्थळ : भारत नाट्य मंदिर
दिनांक : १४ ऑक्टोबर २०२४
वेळ : सायंकाळी ६ वाजता



# २५ वर्षांची यशस्वी वाटचाल...

एकांकिका स्पर्धा हा आपल्या क्लबचा मानबिंदूचं आहे. २०००-२००१ मध्ये सुरु झालेली ही स्पर्धा या वर्षी रौप्य महोत्सव साजरा करीत आहे.आपल्या सर्वांच्या साठी ही अतिशय आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. त्या निमित्त्याने एका स्मरणिकेचे प्रकाशन केले जाणार आहे. या वर्षीपासून ही स्पर्धा आपली लाडकी ॲन कै. स्वाती क्षीरसागर हिच्या नावाने ओळखली जाणार आहे.




## एकांकिका वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| **सोमवार ,१४ ऑक्टोबर** | | |
| **एकांकिका उद्घाटन सोहळा** | | **सायं. ५:१५ ते ५:४५** |
| RCP शिवाजीनगर | हे सुरांनो बंद व्हा | सायं. ६ ते ७ |
| RCP मेट्रो | ऑटो पुरम् | सायं. ७:१५ ते ८:१५ |
| **मंगळवार, १५ ऑक्टोबर** | | |
| RCP प्राईड | प्रेक्षकांनी क्षमा करावी | सायं. ५:३० ते ६:३० |
| RCP सिंहगड रोड | बूम रँग | सायं. ६:४५ ते ७:४५ |
| RCP हेरिटेज | प्रेषित – एक देवदूत | रा. ८:०० ते ९:०० |
| **बुधवार, १६ ऑक्टोबर** | | |
| RCP फिनिक्स | रंगीत सावली | सायं. ५:३० ते ६:३० |
| RCP प्रिस्टीन | भिंत | सायं. ६:४५ ते ७:४५ |
| RCP वेस्टसाईड | अण्णा माझं काय चुकलं ? | रा. ८:०० ते ९:०० |
| RCP कोथरूड | उत्तर दायित्व्य | रा. ९:१५ ते १०:१५ |
| **गुरुवार, १७ ऑक्टोबर** | | |
| RCP विसडम | शब्दांच्या पलीकडले | सायं. ५:३० ते ६:३० |
| RCP साऊथ | धूसर | सायं. ६:४५ ते ७:४५ |
| RCP पर्वती | गुंता | रा. ८:०० ते ९:०० |
| **शुक्रवार, १८ ऑक्टोबर** | | |
| RCP पुना वेस्ट | खलित्यांची लढाई ( दुसरी) | सायं. ५:३० ते ६:३० |
| RCP गांधीभवन | याच वेळी, याच ठिकाणी | सायं. ६:४५ ते ७:४५ |
| RCP NIBM | रात्र | रा. ८:०० ते ९:०० |
| | **शनिवार , १९ ऑक्टोबर – सुट्टी** | |
| **रविवार, २० ऑक्टोबर** | | |
| **प्रथम पारितोषिक विजेत्या एकांकिकेचे सादरीकरण** | | **सायं. ४:३०. ते ५:३०** |
| चहापान ( परीक्षक + प्रमुख पाहुणे ) | | |
| **पारितोषिक वितरण समारंभ** | | **सायं. ६:१५ ते ८:००** |

# *Down the memory lane...*

## पहिल्या स्पर्धेची क्षणचित्रे



पहिल्या स्पर्धेचे ड्रॉज श्रीकांत मोघे यांच्या हस्ते



प्रथम पारितोषिक विजेती एकांकिका भगवान श्री सखाराम बाईंडर पुणे मेट्रो






**उद्घाटन समारंभ २७ सप्टेंबर २०००. परीक्षक** : लालन सारंग ,प्रतिभा दाते , प्रसाद बनारसे





**पारितोषिक वितरण समारंभ १ ऑक्टोबर २००० – प्रमुख पाहुणे : दिलीप प्रभावळकर**

### Programs in the month of October

| Date | Program | Time | Place |
|---|---|---|---|
| 7th oct 2024 | झाँसी की राणी केवल स्वातंत्र्य सेनानी नही | 7.30pm | Arkey Hall Prabhat Road |
| 14-20oct 2024 | Ekankika competition | 5.00pm onwards | Bharat Natya Mandir |
| 21st oct.2024 | Felicitations for Ekankika | 7.30 pm | Arkey Hall, Prabhat Road |
| 26th oct 2024 | Diwali Party - music program by Mrudula Dadhe Joshi | 6.30 pm | Munot Sabhagruh |
| 27th Oct | Diwali celebration | 10.00am | Sarthak Seva sangh , Saswad |